# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक-07.06.2026 वार- रविवार

---

**मान्सून**

मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतल्या काही भागांमध्ये 9 जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र, त्यानंतर किमान 15 जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर कमी होण्याची तसंच मान्सूनच्या प्रगतीचा वेगही कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळं शेतकऱ्यांनी आगामी वादळी पावसावर अवलंबून राहून पेरणीची घाई करू नये. विजांच्या कडकडाटावेळी झाड, तसंच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ थांबू नये,असं आवाहन कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागानं केलं आहे.

**वृक्षारोपण-सुनेत्रा पवार**

दरम्यान बारामती शहर आणि परिसरात शुक्रवारच्या वादळी पावसामुळं अनेक झाडं उन्मळून पडली आहेत; या झाडांचं मुळासकट पुनर्रोपण करावं, आणि नव्यानं अधिकाधिक वृक्षारोपण करावं असं आवाहन उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी केलं आहे. त्या आज बारामती इथं बोलत होत्या. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एन्व्हॉर्यमेंटल फोरम ऑफ इंडिया, बारामती सायकल क्लब आणि बारामती हेल्थ क्लब यांनी आयोजित केलेल्या सायकल रॅलीला पवार यांनी झेंडा दाखवून रवाना केलं.

**बस लोकार्पण**

एस.टी.च्या बारामती आगारात ‘राजमाता जिजाऊ’ या अत्याधुनिक स्मार्ट बससेवेचं लोकार्पण आज उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आलं. बसमधील स्वच्छता राखणं, बस वेळेवर सोडणं, प्रवाशांची सुरक्षितता आणि त्यांच्या समस्या सोडविण्यावर राज्य परिवहन महामंडळानं भर द्यावा, असे निर्देश पवार यांनी यावेळी दिले. बारामती बसस्थानकाला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियानामध्ये 1 कोटी रुपयांचं प्रथम क्रमांकांचं बक्षीस मिळल्याबद्दल बारामतीकरांचं आणि महामंडळाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचं त्यांनी अभिनंदन केलं.

**सुचेता दलाल**

सायबर गुन्हेगार केवळ आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत नाही, तर माणसाच्या मानसिकतेशी खेळत आहेत; असं मत ज्येष्ठ पत्रकार सुचेता दलाल यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. शशांक वाघ यांनी लिहिलेल्या 'एव्हरीथिंग इज फेअर' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात त्या बोलत होत्या. खासदार डॉ. मेधा कुलकर्णी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. 'डिजिटल अरेस्ट' ही केवळ पैशांची लूट नाही तर, पीडित व्यक्तीच्या मनात भीती निर्माण करून, त्याला मानसिकदृष्ट्या ताब्यात घेण्याची आणि सुशिक्षित नागरिकांना जाळ्यात ओढण्याची एक अत्यंत नियोजनबद्ध पद्धत आहे, असं सुचेता दलाल म्हणाल्या. रंजक कथेच्या माध्यमातून सामान्य वाचकांपर्यंत सायबर धोके अधिक प्रभावीपणे पोहोचू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**कचरा वर्गीकरण**

स्वच्छ, हरित आणि शाश्वत शहर उभारण्यासाठी प्लास्टिकचा वापर कमी करणं, कचऱ्याचं योग्य व्यवस्थापन करणं गरजेचं असून यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे,असं मत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.विजय

सूर्यवंशी यांनी व्यक्त केलं आहे.केंद्र शासनानं अधिसूचित केलेल्या घनकचरा व्यवस्थापन नियम 2026 च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात आज विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी ते बोलत होते.

**सायकल दिन**

सायकल हा केवळ प्रवासाचा पर्याय नसून तो निरोगी, पर्यावरणपरक आणि शिस्तबद्ध जीवनशैलीचा भाग आहे.नागरिकांनी दैनंदिन जीवनात सायकलचा अधिकाधिक वापर करावा, असं आवाहन पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनी केलं आहे. जागतिक सायकल दिनानिमित्त 'संडेज ऑन सायकल' या उपक्रमाचं उद्घाटन करताना त्या आज बोलत होत्या. म्हाळुंगे-बालेवाडी इथल्या शिवछत्रपती क्रीडा संकुलात आयोजित या कार्यक्रमामध्ये विविध वयोगटातील सायकलपटूनी मोठ्या संख्येनं सहभाग नोंदवला. महापौर नागपुरे यांनी स्वतः देखील सायकल चालवत निरोगी जीवनशैलीसाठी सायकलिंगच महत्त्व अधोरेखित केलं.

**वाहन कारवाई**

राज्यातल्या रस्ते सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या अतिभार आणि इतर अवैध मालवाहतुकीच्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी परिवहन आयुक्त कार्यालयानं राज्यभर विशेष तपासणी मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत. या मोहिमे अंतर्गत राज्यातील विविध आरटीओ कार्यालयांच्या पथकांना इतर जिल्ह्यांमध्ये पाठवून संयुक्त तपासणी करण्यात येणार आहे. दोषी आढळणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

**पार्टी कारवाई**

पुणे जिल्ह्यातील लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतल्या तुळापूर इथल्या एका अनधिकृत पार्टीवर पोलिसांनी आज पहाटे धडक कारवाई करत सुमारे 85 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत मद्यसाठा, बंदी घातलेले हुक्का फ्लेवर्स आणि गांजा जप्त करण्यात आला आहे. या पार्टीमध्ये 107 पुरुष आणि 49 महिलांचा समावेश होता.

**सत्कार**

ज्येष्ठ कवयित्री, लेखिका भारती पांडे यांना रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे काव्य जीवन गौरव पुरस्कारानं आज पुण्यात सन्मानित करण्यात आलं. भारती पांडे या उत्तम अनुवादक, तसंच संवेदनशील आणि चिंतनशील कवयित्री आहेत, असे गौरवोद्गार ज्येष्ठ लेखक श्रीपाल सबनीस यांनी यावेळी काढले.

**पुणे हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल 38 अंश तर किमान 25 पूर्णांक 8 दंशांश अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं. उद्या तापमानात काहीशी घट होण्याचा अंदाज आहे, तसंच दुपारनंतर विजांसह हलका पाऊस पडण्याचीही शक्यता आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू ताज्या पुणे वृत्तांतमध्ये उद्या संध्याकाळी सहा वाजता.**

**नमस्कार.**